# महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,मुंबई

दूरध्वनी क्र. :२४०१०४३७/२४०२०७८१
२४०१४७०१
फॅक्स क्र. : २४०२४०६८
*Visit us at* : http://mpcb.gov.in
Email:mpcb@gov.in

कल्पतरु पाईंट, २ रा मजला,
सायन-माटुंगा स्किम मार्ग क्र ८,
सायन सर्कल समोर, सायन (पूर्व)
मुंबई:- ४०० ०२२.

जा.क्र.मप्रनि/आस्था/ ६८८ दिनांक ५/०४/२०१३

## प रि प त्र क

विषय: महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळातील अधिकारी/कर्मचारी यांना मोठया/गंभीर स्वरुपाच्या आजारासंबंधी वैद्यकीय प्रतीपूर्ती मंजूर करण्याबाबत

संदर्भ: १. शासन निर्णय क्रमांक एमएजी-२००५/९/प्र.क्र.१/आरोग्य-३ दिनांक १९/०५/२००५
२. जा.क्र.मप्रनि/आस्था/ब-१४६, दि. ९/२/२००७
३. परिपत्रक क्रमांक मप्रनि/लेखा/५००, दि. २२/०३/२०११
४. शासन निर्णय क्रमांक वैखप्र-२०११/प्र.क्र.३३३/११/ राकावि-२, दिनांक १६/११/२०११

मंडळातील परिविक्षा कालावधी पूर्ण न झालेल्या क्षेत्र अधिकाऱ्यांना वैद्यकीय खर्च प्रतिपूर्ती योजना लागू करण्याबाबतचे प्रस्ताव मुख्यालयात सादर करण्यात आलेले आहेत.

या संदर्भात कळविण्यात येते की, महाराष्ट्र राज्य (वैद्यकीय देखभाल ) नियम १९६१ नियम २ (क) प्रमाणे शासकीय कर्मचारी (रोजंदारीवर नेमलेले कर्मचारी वगळता) १ वर्षापेक्षा कमी सेवा नसलेले व कार्यव्ययी आस्थापनेवर नेमलेले कर्मचारी यांना सदर नियम लागू होतात, त्यानुसार परिविक्षा कालावधी पूर्ण न झालेल्या, परंतु वरील नियमानुसार अटींची पूर्तता करीत असलेल्या क्षेत्र अधिका-यांना मोठया व गंभीर स्वरुपाच्या आजारासंबंधी वैद्यकीय प्रतीपूर्ती नियमाप्रमाणे मंजूर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

संदर्भ क्रमांक १ व ४ च्या शासन निर्णयानुसार व दिनांक २२/०३/२०११ च्या परिपत्रकामध्ये वैद्यकीय खर्च प्रतिपूर्ती संदर्भात प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार उपरोक्त क्षेत्र अधिकाऱ्यांची वैद्यकीय प्रतीपूर्तीची देयके अदा करण्यात यावीत.

( राजीव कुमार मित्तल, भा.प्र.से. )
सदस्य सचिव

प्रत माहितीसाठी-

१. प्रधान वैज्ञानिक अधिकारी /जल प्रदूषण निवारण अभियंता/हवा प्रदूषण निवारण अभियंता

२. सहायक सचिव (तांत्रिक)/मुख्य लेखा अधिकारी, मुंबई/वरिष्ठ विधी अधिकारी, विधी व योजना विभाग

३. वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी, म. प्र. नि. मंडळ, मुंबई

४. वरिष्ठ वैज्ञानिक अधिकारी,मध्यवर्ती प्रयोगशाळा,निर्मलभवन,महापे, नवी मुंबई

५. कार्यकारी अभियंता, म. प्र. नि. मंडळ, मुंबई

६. प्रादेशिक अधिकारी, मुख्यालय/मुंबई/ठाणे/कल्याण/रायगड/नवीमुंबई/पूणे/नशिक/नागपूर
औरंगाबाद/कोल्हापूर/अमरावती/चंद्रपूर

७.उप-प्रादेशिक अधिकारी, मुंबई-१/मुंबई-२/मुंबई-३/मुंबई-४/ठाणे-१/ठाणे-२/तारापूर-१/तारापूर-२/
नवी मुंबई-१/नवीमुंबई-२/तळोजा/कल्याण-१/कल्याण-२/कल्याण-३/भिवंडी/रायगड-१/रायगड-२/
/महाड/कोल्हापूर/सांगली/रत्नागिरी/चिपळूण/पूणे-१/पूणे-२/पिंपरी-चिंचवड/सातारा/सोलापूर/
औरंगाबाद-१/औरंगाबाद-२/औरंगाबाद-३/नांदेड/नाशिक/अहमदनगर/जळगाव-१/जळगाव-२/
नागपूर-१/नागपूर-२/नागपूर-३/ चंद्रपूर/अमरावती-१/अमरावती-२/अकोला/परभणी/लातूर/भंडारा.

८. संकेतस्थळ, पर्यावरण माहिती केंद्र, म. प्र. नि. मंडळ, मुंबई

९. परिपत्रक नस्ती- २०१३